VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day International Conference On

## RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

(BOOK- 11)

*Guest Editors*
Dr. Madhav Hande
Dr. Grishma Khobragade

ORGANIZED BY
MGEWS
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN, DIST. THANE &
NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI

www.newmanpublication.com

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 35. | शास्त्रीय संगीताच्या विकासात उ. अमीर खाँ यांचे | कु.विष्वेष्वरी जगन्नाथ ठाकरे | 107 |
| 36. | हिंदी की आदिवासी कविता में संघर्ष चेतना | डॉ.संजय जाधव | 111 |
| 37. | Effect of Global Warming on Agricultural in … | Rajkumar D.Kamble | 117 |
| 38. | भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेतील महात्मा बसवेश्वरांचे… | विनोद शिवलिंग पटवारी | 121 |
| 39. | ब्रिटिशकालीन न्यायव्यवस्था | विकास गवई<br>दिपाली सरपे | 124 |
| 40. | बालकामगार समस्या | डॉ.सुरेश त्रिं. सामाले | 129 |
| 41. | कठोपनिषदि लोकोपयोगिनी शिक्षा | प्रा.डॉ. अखिलेश शर्मा | 132 |
| 42. | मानवी विकास व निर्देशांक | मीनाक्षी भी. जाधव<br>प्रा. शिदें ए.एस. | 134 |
| 43. | आदिवासी साहित्य – श्रीवर्धन तालुक्यातील कोळी व कातकरी … | प्रशांत उत्तम आहिरे | 137 |
| 44. | सृष्टीतील नादब्रह्म | डॉ.दीपाली सौरभ काटे | 141 |
| 45. | मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीवा | डॉ. अनिल गर्जे | 143 |



Scanned with OKEN Scanner

42

# मानवी विकास व निर्देशांक

प्रा. मीनाक्षी भी. जाधव
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शि.म.ज्ञा. मोहेकर महाविद्यालय
कळंब जि. उस्मानाबाद
मो. 8381096085

प्रा. शिदें ए.एस.
अर्थशास्त्र विभाग
शि.म.ज्ञा. मोहेकर महाविदयालय
कळंब जि. उस्मानाबाद
मो. 9767032548

**प्रस्तावना :–** आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मानवी संसाधन अतिशय महत्त्वाचे असतात. या संसाधानाचा संबंध हा देशाच्या लोकसंख्येशी जोडला जातो. या संसाधनाचे स्वरुप हे देशातील लोकसंख्या, शिक्षण व रोजगार या बाबीशी निगडीत असते. विश्वातील प्रत्येक देश हा मानवी संसाधनाच्या साहयाने विकास साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे.आर्थिक विकास ही दिर्घकाळ चालणारी प्रकीया आहे. त्यामुळे त्यात मानवी साधनसामुग्रीची गरज खुप मोठया प्रमाणात लागणार आहे. आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर संस्थात्मक व गुणात्मक अशा दोन्ही मानवी भांडवलाची आवश्कता असते. आर्थिक विकासामुळे श्रम रुपाने निंवाह क्षेत्रात पडून असणारी शक्ती उपयोगात येवून उत्पादन वाढते. म्हणूनच आर्थिक विकासाला औदयोगिकिरण असे देखिल म्हणतात. पुर्वी एखादया देशाची आर्थिक विकास मोजण्यासाठी दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा विचार केला जात असे. आधुनिक काळात त्यात बदल होउन नवीन सकल्पनेचा विचार करण्यात आला. ज्याला मानव विकास निर्देशांक व जीवनाचा भौतिक जीवनाचा निर्देशांक असे म्हटले जाते.

**संशोधनाचा उददेशः–**

1) मानव विकास निर्देशाकांची भारतीय स्थीती जाणून घेणे.
2) मानव विकासाच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणाम जाणून घेणे.
3) मानव विकासाच्या निर्देशांक वाढीसाठी सरकारने कोणते प्रयत्न केले आहेत ते माहित करणे.
4) भारताचे मानव विकास निर्देशांकातील स्थान उंचावले आहे की , नाही याचा चिकित्सक अभ्यास करणे.

मानव विकास निर्देशांक मानवी विकासाचे मोजमाप करणे खुपच कठीण असते. जसा आर्थिक विकास दरडोई एकूण निव्वळ उत्पन्नाचा साहयाने मोजाला जातो. तसाच मानवी विकास वेगवेगळया दृष्टीकोनातून मोजला जातो. आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्ना व्यतिरिक्त मानव विकास निर्देशांक सोयीचा ठरतो. मानव विकास निर्देशांक हा शिक्षण, आरोग्य आणि आहार या सर्वच दृष्टिकोनातुन तयार केला जातो.

सर्वप्रथम मानव विकास निर्देशांक 1990 मध्ये सुयुक्त Nation विकास कार्यकमार्तंगत सुप्रसिध्द अर्थशास्त्र मेहबूब–उल–हक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. तेव्हा पासुन UNDP तर्फे प्रत्येक वर्षी मानव विकास अहवाल प्रकाशित केला जातो. या अहवालात विकासाच्या विभिन्न घटकांची चर्चा करून विविध देशांच्या निर्देशांकाच्या पातळीनुसार कमांक दिला जातो. आयुर्मान आणि साक्षरता यानुसार विभागलेली लोकसंख्या उत्पन्नानुसार विभागलेल्या लोकसंखेपेक्षा जास्त उपयुक्त असा निर्देशांक ठरतो. हा निर्देशांक वरील बाजुने वाढणारा असेल तर विकास साधारण आहे असे म्हटले जाते. समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढत असेल. आरोग्यमान चांगले राहत असेल तर उत्पन्न वाढी पेक्षा हा बदल आर्थिक विकासाच्या मोजमापाच्या दृष्टिने जास्त महत्वाचा ठरतो.

मानव विकास निर्देशांकाची रचना :– (Structure of HDI) मानाव विकास निर्देशांक तयार करताना प्रामुख्याने तीन घटक विचारात घेतले जातात. व त्यांचा स्वतंत्र निर्देशांक तयार केला जातो.

1. दिर्घायुष्य / वयोमान
2. ज्ञान / साक्षरता दरा
3. जीवनमान / राहणीमान

दिर्घायुष्य हे सरासरी आर्यमानाच्या साहयाने मोजले जाते. ज्ञान हे साक्षरतेच्या साहयाने (प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण) तर जीवनमानाचा दर्जा हा वास्तव स्थूल National उत्पन्नाच्या साहयाने किंवा पैशातील खरेदीशक्तीच्या साहयाने मोजले जाते.

मानव विकास निर्देशांक तयार करताना प्रत्येक निर्देशांकाचे स्थिर कमाल व किमान मुल्य हे निश्चित केले जाते.



Scanned with OKEN Scanner

सरासरी आर्युमान – 25 वर्ष ते 85 वर्ष
प्रौढ साक्षरता दरा – 0% ते 100%
संयुक्त नामांकन अनुपात – 0% ते 100%
दरडोई स्थुल उत्पन्न – 100$ ते 40000$ डॉलर

वरील सर्व मानव विकास निर्देशांकाचे घटक खालील सुत्राच्या साहयाने मांडले जातात. व त्याच्या साहयाने निर्देशांक तयार केला जातो.

निर्देशांक = <u>प्रत्यक्ष मूल्य – किमान मुल्य</u>
कमाल मूल्य – किमान मूल्य

उदा. एखादया देशातील सरासरी आयुर्मान 60 वर्ष असेल तर सरासरी आर्युमानाचा निर्देशांक 0.583 असेल.

<u>60–25</u> = <u>35</u> = 0.583
85–25 60

आयुर्मान निर्देशांक :

जर्मनी – <u>77.6-25</u> = <u>52.6</u> = 0.87785-
25 60

भारत – <u>62.9-25</u> = <u>37.9</u> =
0.632 85-25 60

साक्षरता दर (प्रौढ) :

जर्मनी –<u>99-0</u> = <u>99</u> = 0.990
100-0 100

भारत –<u>56-0</u> = <u>56</u> = 0.877
100-0 100

शैक्षणिक कौशल्य निर्देशांक :

जर्मनी – 2 (9.990) + 1 (0.940) /3 = 0.973

भारत – 2 90.565) + 1 (0.560)/3 = 0.563

जर्मनीच्या तुलनेत भारताचा मानव विकास निर्देशांक हा खुपच कमी आहे. त्यामुळे दोन्ही देशाच्या विकासामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे आर्थिक विकास मानव विकासाअभावी मंदगतीने होत आहे. जर्मनीचा आर्थिक विकास झपाटयाने झाला आहे कारण मानव विकास निर्देशांक जास्त आहे.

**मानव विकास निर्देशांकाची गटवारा विभागणी :** 2005 च्या मानव विकास निर्देशांकाच्या आधारे विभिन्न देशांची तीन गटात विभागणी केली जाते.

**उच्च मानव विकास गट** :–ज्या देशाचा मानवविकास निर्देशांक 0.8 किंवा त्यापेक्षा जास्त आहे. त्या सर्व देशाचा समावेश यात केला जातो.

उदा. नार्वे, अमेरिका, जपान इ.

**मध्यम मानव विकास गट** :–यामध्ये ज्या देशाचा मानव विकास निर्देशांक 0.5 ते 0.8 च्या दरम्यान आहे. त्या सर्व देशाचा समावेश केला जातो.

उदा. चीन, भारत, श्रीलंका इ.

**कनिष्ठ मानव विकास गट** :–या गटामध्ये ज्या देशाचा मानव मानव विकास निर्देशांक 0.5 पेक्षा कमी असतो. त्या सर्व देशाचा समावेश केला जातो. उदा. पाकिस्तान, बांग्लादेश.

**मानव विकास निर्देशांक आणि भारत :–** 1990 पासुन मानव विकास निर्दोशांकाची मापनाची सुरुवात झाली. या निर्देशांकाची रचना नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन व महबुब - उल – हक यांनी केली. भारत सरकारने 2001 मध्ये आपला मानव विकास अहवाल सर्वप्रथम जाहिर केला.

संयुक्त Nation विकास कार्यकमचा मानव विकास अहवाल 2011 रोजी प्रकाशित करण्यात आला. जगातील काही देशातील मानव विकास निर्देशांक खालील तत्कत्याच्या माध्यमातुन दिला आहे.

| क्र. | देश | मा.वि. निर्देशांक | कमांक |
|---|---|---|---|
| 1 | नार्वे | 0.949 | 1 |
| 2 | Austrialia | 0.939 | 2 |
| 3 | स्वीत्र्झलॅड | 0.939 | 3 |
| 4 | कॅनडा | 0.908 | 6 |
| 5 | जर्मनी | 0.905 | 9 |
| 6 | जपान | 0.901 | 12 |
| 7 | फ्रान्स | 0.884 | 20 |
| 8 | सिंगापूर | 0.866 | 26 |
| 9 | U.K. | 0.863 | 28 |
| 10 | व्हेनेझूएला | 0.735 | 73 |
| 11 | ब्राझिल | 0.718 | 84 |
| 12 | चीन | 0.687 | 101 |
| 13 | फिलीपाईन्स | 0.644 | 112 |
| 14 | दक्षिण आफ्रिका | 0.619 | 123 |
| 15 | मोरोक्को | 0.582 | 130 |
| 16 | भारत | 0.504 | 131 |
| 17 | पाकिस्तान | 0.501 | 145 |
| 18 | बांग्लादेश | 0.501 | 146 |
| 19 | नायजेर | 0.374 | 174 |
| 20 | सियोरा लियोन | 3.36 | 188 |

**Source UNDP,Human Development Report – 2016**



Scanned with OKEN Scanner

188 देशाच्या यादीमध्ये नार्वे हा देश प्रथम कमांकावरती असून सियरा लियोन हा देश सर्वात तळाशी आहे.

**मानव विकासाचे गुणात्मक घटक :–** मानव विकासाचे प्रामुख्याने तीन गुणात्मक घटक आहेत.

1) समाजातील सर्व लोकांना संधीची समानता.
2) Acceptable for the one generation to another generation to chances.
3) विकास प्रकीयेपासून फायदे व प्राप्त करण्यासाठी आणि त्या प्रकीयेत सहभागी होण्यासाठी लोकांचे सबलीकरण.

**भारतातील विभिन्न राज्यातील मानव विकास निर्देशांकाची स्थीति** भारताने सर्वप्रथम 2001 मध्ये मानव विकास अहवाल प्रकाशित केला होता. त्यानुसार भारताचा मानव विकास निर्देशांक 0.387 होता. तर 2011 मध्ये तो वाढुन 0.467 झाला. 2016 मध्ये त्यात वाढ होउन 0.624 इतका झाला. 2011 नुसार भारतातील केरळ राज्य पहिल्या कमांकावरती आहे.

| क. | राज्य | मा.वि. नि. | क. |
|---|---|---|---|
| 1 | केरळ | 0.79 | 1 |
| 2 | पंजाब | 0.605 | 2 |
| 3 | Maharashtra | 0.572 | 3 |
| 4 | आंध्रप्रदेश | 0.473 | 11 |
| 5 | बिहार | 0.367 | 17 |
| 6 | गुजरात | 0.527 | 8 |
| 7 | हरियाणा | 0.552 | 7 |
| 8 | कर्नाटक | 0.519 | 9 |
| 9 | मध्य प्रदेश | 0.375 | 16 |
| 10 | तामीळनाडू | 0.57 | 6 |
| 11 | उत्तर प्रदेश | 0.38 | 14 |

Source – G.V. of India Planning commission I.H.D.R.2011

**मानव विकास निर्देशांकाचे महत्व :–** या निर्देशांक उत्पन्न हे निर्देशांक न्युनविकसित देशातील गरीब लोकांच्या जीवनमानाचा दर्जा दर्शविणारे एकमेव साधन आहे. त्याच बरोबर इतर दोन निर्देशक शैक्षणिक प्राप्ती आणि अपेक्षित आर्युमान यांच्या आधारे सामाजिक प्रगतीचा ही विचार मा.विकासासाठी आवश्यक आहे.मा.वि. निर्देशांकात जीवनाच्या गुणवत्तेचा विचार करण्यात आला आहे. न्युन विकसित देशांना आपल्या कमांकासाठी हा निर्देशांक महत्वाचा आहे. त्याच प्रमाणे ज्याच्या माध्यमातून जागतिक विकासातील तरी स्पष्ट समजून येते. या निर्देशांकाने उत्पन्नाला कमी महत्व दिल्याने अनेक देशांनी आपले उद्दिष्ट केवळ आर्थिक वृध्दि पुरते मर्यादित न ठेवता मानव विकासापर्यंत व्यापक केले आहे.

**मर्यादा :–**

**अनेक घटकांकडे दुर्लक्ष :–**मानव विकासाचे मापन करतान बालमृत्यु, सुरक्षितता, पोषण आहारा यासारख्या घटकांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

**अपरिपक्व निर्देशांक :–**डॉ. अर्मत्य सेन यांच्या मते मानवी विकासातील गुंतागुंतीची वास्तवता एका साध्या आकडयाच्या साहयाने निश्चित करणे कठीण आहे. त्यामुळे हा निर्देशांक अपरिपक्व ठरते.

**अनिश्चितता:–**या निर्देशांकात भारांकाचा वापर करण्याची निश्चित अशी पद्धत नाही. त्यामुळे तो पुर्णपणे बरोबर येत नाही.

**आर्थिक विषमतेच्या समस्येकडे दुर्लक्ष :–**मानव विकास निर्देशांक देशातील आर्थिक विषमतेच्या समस्येकडे लक्ष केंद्रीत करत नाही. त्यातून देशाची वाढती लोकसंख्या, बेकारी, दारिद्रय, प्रादेशिक असमतोल इ. देशापुढील महत्वाच्या समस्या जाणिवपुर्वक दुर्लक्षित राहतात.

मानव विकास निर्देशांकावर वरील प्रमाणे काही मर्यादा येत असल्या तरी मानव विकास निर्देशांक हे आर्थिक विकासाचे एक महत्वपूर्ण मापन म्हणून जगामध्ये सर्वत्र मान्य झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**


१. भारत आणि जागतिक आर्थिक विकास – डॉ. एस के ढगे.
२. भारतातील आर्थिक विकास व नियोजन – डॉ. बी जी. खटाळ
३. आर्थिक विकास व नियोजन – डॉ वसुधा पुरोहित
४. विकासाचे अर्थशास्त्र व नियोजन – प्रा. अशोक पली
५. Economic Development & Planning – Mishra , Puri.
६. UNDP Reports – 2011-2016
७. आर्थिक व सामाजिक विकास – डॉ. किरण जी. देलसे


□□□



Scanned with OKEN Scanner